ePaper

वर्ष - 8 । अंक - 269 | UDYAM-MH-26-0158827

**35 चेंडूत थेट शतक, वैभवला मिळाले फक्त 1 कोटी, 36 वर्षाच्या कोहलीवर पैशांची बरसात!**




महाईन्यूज ™

## आतील पानांत


- १४ वर्षीय वैभवने रचला इतिहास!
- आयपीएल सामन्यांची संख्या वाढणार!
- मोदी पाकिस्तानचे चार तुकडे करतील
- पर्यटकांना सुरक्षित पाठवणे माझे कर्तव्य


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 29 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांचे धडाधड राजीनामे !

# काँग्रेसींना पाकड्यांचा पुळका, ओवैसींनी मात्र धू ऽऽधू धुतले!

## जगभर भारताला पाठिंबा : विरोधी पक्ष पाकड्यांच्या बाजूने

। नवी दिल्ली / मुंबई / इस्लामाबाद । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पहलगाम येथील हिंदूंवर झालेल्या हल्ल्यानंतर भारत - पाकिस्तान दरम्यान तणावाचे वातावरण असताना आणि युद्धसदृश परिस्थिती असताना येथील काँग्रेसप्रणित 'इंडी' आघाडीचे नेते पाकिस्तानचे प्रवक्ते असल्याप्रमाणे बोलत असून भारत सरकारच्या अनेक निर्णयांवर संशय व्यक्त करत आहेत. या उलट 'एमआयएम'चे नेते असदुद्दीन ओवैसी हे मात्र पाकिस्तानच्या राजकारण्यांवर तोंडसुख घेत असून भारताची बाजू लढवत असून पाकड्यांना धू SS धू धुताना दिसत आहेत.**





### राऊत, देशमुख वडेट्टीवार

पहेलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या वेळी दहशतवाद्यांनी 'हिंदू का?' असे कोणालाही विचारले नसल्याचा जावईशोध संजय राऊत, अनिल देशमुख यांच्या पाठोपाठ आता विजय वडेट्टीवार यांनी लावला आहे. त्या हल्ल्यातील बचावलेल्या महिलांनी जी परिस्थिती सांगितली, ती खरी मानण्यास 'इंडी' आघाडीतील नेते तयार नसावेत. मृतांच्या नातेवाईकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम हे नेते करीत आहेत, अशी टीका भाजपाच्या अनेक जणांनी केली आहे. दरम्यान, पाकिस्तानच्या अनेक नेत्यांना असदुद्दीन ओवैसी यांनी मात्र चांगलेच झापले आहे.



### बिलावल भुट्टो यांना सुनावले

पाकिस्तान पीपल्स पार्टीचे अध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी यांनी हा दहशतवादी हल्ला नसल्याचे म्हटले आहे. त्यांची कान उघाडणी करताना ओवैसी यांनी अत्यंत तिखट भाषेचा वापर केला आहे. बिलावल यांना वास्तविक दहशतवाद म्हणजे काय ते माहीत आहे. त्यांचे आजोबा, झुल्फीकार अली भुट्टो आणि आई बेनझीर भुट्टो यांची हत्या दहशतवाद्यांनीच केली होती ना? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

### पाकिस्तान मलेरियाची औषधे तरी बनवतो का?

असदुद्दीन ओवैसी यांनी छ. संभाजीनगर येथे पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी पाकिस्तानला अक्षरशः



झोडपले. पाकिस्तान मलेरियाची औषधे बनवू शकत नाही, ते काय बोलणार? असा टोला असदुद्दीन ओवैसींनी लगावला.

### निष्पाप लोकांना मारणारे चांगले का?

शहबाज शरीफ सरकारमध्ये मंत्री असणारे बिलावल भुट्टो हे नुकतेच राजकारणात आले आहेत. दहशतवाद्यांनी त्यांच्या आईची गोळ्या घालून हत्या केली. ही गोष्ट समजण्याची आवश्यकता आहे. बिलावल यांच्या आईला मारणारे दहशतवादी आणि आमच्या देशातील निष्पाप लोकांना मारणारे चांगले का?" असा सवाल ओवैसींनी केला.

### युद्धाचा निर्णय सरकारने घ्यावा..

भारत-पाकिस्तान युद्धाचा निर्णय सरकारने घ्यावा. सरकारने दहशतवाद कायमचा संपवावा, अशी आमची मागणी आहे. पाकिस्तानला 'एफ.ए.टी.एफ.' च्या 'ग्रे लिस्ट' मध्ये टाकणे आवश्यक आहे. भारत सरकारने पाकिस्तानला ग्रे लिस्टमध्ये टाकावे, अशी आमची विनंती आहे, असे ते म्हणाले.

### हिंदू-मुस्लिम दंगे भडकण्यासाठी खटाटोप..!

पाकिस्तानातील प्रमुख दहशतवादी संघटना आय.एस.आय, इसीस किंवा पाकिस्तानमधील इतर दहशतवादी संघटनांना भारतात हिंदू-मुस्लिम वाद व्हावा, असे वाटते. काश्मीरमध्ये गैर-मुस्लिम राहू शकत नाहीत, हे त्यांना दाखवायचे आहे. जात-धर्म विचारून मारहाण करणाऱ्यांचा आम्ही निषेध करतो, असे ओवैसी यांनी म्हटले आहे. काश्मिरी आदिलने हिंदू-मुस्लिम असा भेदभाव केला नाही. जर कोणी हिंदू-मुस्लिम करत असेल, तर ते चुकीचे आहे, असे ते म्हणाले.

### आत्मसंरक्षणासाठी हल्ला करावा...

भारताला आत्मसंरक्षणासाठी हल्ला करण्याचा अधिकार आहे. बेकायदेशीर पैशातून दहशतवाद्यांना मदत मिळत आहे. सरकारने यावर कारवाई करावी, असेही ओवैसींनी स्पष्टपणे नमूद केले आहे.

### शाहिद आफ्रिदी तर जोकर..!

शाहिद आफ्रिदी कोण आहे? त्या जोकराचे नाव घेऊ नका. त्याला कोणताही जाब विचारण्याचा अधिकार नाही.

### पाक लष्करी अधिकाऱ्यांचे राजीनामे

भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांना 'अलर्ट मोड' वर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तर पाकिस्तानकडूनही सीमारेषेवर सैन्याची जमवाजमव सुरु झाली आहे. कोणत्याही क्षणी युद्धाला तोंड फुटेल. युद्धाचे हे ढग दाटले असताना पाकिस्तानी लष्करात भूकंप माजवणारी एक बातमी समोर आली आहे. सध्या पाकिस्तानी सैन्यदलात अधिकारी आणि सैनिक राजीनामे देत आहेत.

# पुणे विमानतळाच्या 'कनेक्टिव्हिटी'ला गती

## चार मार्गिका विमानतळाला जोडण्याचे नियोजन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराच्या कोणत्याही भागातून पुणे विमानतळावर येणे सुलभ व्हावे या दृष्टीने विमानतळाची 'कनेक्टिव्हिटी' वाढविण्यात येणार आहे. त्यानुसार खडकवासला ते खराडी ही मेट्रो मार्गिका विमानतळाला जोडण्याचे विचाराधीन आहे. त्याबाबतचे नियोजन सुरू झाले असून, मेट्रो मार्गिकांचा विस्तार करण्यासाठी सविस्तर प्रकल्प आराखडा करण्यासाठी महापालिकांनी निधी द्यावा आणि महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने डीपीआर करावा, अशी सूचना करण्यात आली आहे.**




केंद्रीय नागरी हवाई राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली विमानतळ सल्लागार समितीची (एएसी) बैठक झाली. तीन वर्षांनंतर होत असलेल्या या बैठकीत विमानतळाशी संबंधित अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर मोहोळ यांनी त्याबाबतची माहिती दिली. पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके, वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांच्यासह व्यापार, उद्योग, पर्यटन आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती यावेळी उपस्थित होते.'पुण्यातील सध्याच्या चार मेट्रो मार्गिका थेट पुणे विमानतळाशी जोडण्यात येणार आहेत. खडकवासला ते खराडी ही मेट्रो मार्गिकाही विमानतळाला जोडण्यात येणार आहे. त्यासंदर्भात मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालकांबरोबर चर्चा झाली असून, भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालयातील अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करण्यात आली आहे. मेट्रो मार्गिका महापालिकांच्या अखत्यारित येत असल्याने त्यांनी विमानतळापर्यंतच्या विस्तारित मार्गिकाचा डीपीआरसाठी निधी द्यावा आणि महामेट्रोने डीपीआर करावा, अशी सूचना अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे,' असे मोहोळ यांनी सांगितले.येत्या ५० ते १०० वर्षांचा विचार करून पुणे विमानतळाचा विस्तार करण्यात येणार आहे. त्यासाठी २०० एकर जागेची आवश्यकता असून, त्यातील २५ एकर जागा संरक्षण विभागाकडून घेण्यात येणार आहे. त्याबदल्यात संरक्षण विभागाला दुसरीकडे जागा दिली जाणार आहे. तर, ६५ एकर खासगी जागेची हस्तांतरण करण्यात येणार असून उर्वरित जागेसाठीही चर्चा सुरू झाल्याची माहिती मुरलीधर मोहोळ यांनी दिली. विमानतळ धावपट्टीच्या विस्तारासाठी 'ओएलएस' सर्वे झाला असून, सर्व विभागांसमवेत बैठका सुरू आहेत. भूसंपादनाचे काम राज्य सरकारकडून करण्यात येणार आहे. विमानतळालगतच्या रस्त्याला पर्यायी रस्ता करावा लागणार असून, पुणे महापालिका त्यासाठी ६५ कोटींचा खर्च करणार आहे. कार्गोसाठीही स्वतंत्र व्यवस्था केली जाईल, असेही मोहोळ यांनी सांगितले.

### दोनशे एकर जागेची आवश्यकता

कोटपुण्यातून दररोज २०० विमानांची ये-जा होत असून ५२ हजार चौरस मीटर क्षेत्रावर नवीन टर्मिनल सुरू करण्यात आले आहे. जुन्या टर्मिनलचाही पुनर्विकास करण्यात येणार असून, नव्याने काही ठिकाणी विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. धावपट्टी विस्तारासाठी सातत्याने बैठका सुरू आहेत. तीन वर्षांनंतर होत असलेल्या या बैठकीत विमानतळाशी संबंधित अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर मोहोळ यांनी त्याबाबतची माहिती दिली. पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके, वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांच्यासह व्यापार, उद्योग, पर्यटन आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती यावेळी उपस्थित होते.

# विनापरवाना खोदकामावर कारवाई!

## संबंधितांविरोधात तक्रार देण्याचा पालिकेच्या पथ विभागाचा इशारा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून शहरातील रस्ते सुस्थितीत आणल्यानंतर आता यापुढील काळात कोणतेही रस्ते खोदले जाणार नाही, असा शब्द महापालिकेच्या पथ विभागाने दिला होता. मात्र, त्यानंतरही हे रस्ते खोदले गेल्याने हे रस्ते खोदणाऱ्या संबंधित ठेकेदार, बिल्डर आणि हे काम करायला लावणाऱ्या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पथ विभागाकडून देण्यात आली.**





शहरातील रस्त्यांवरून ये-जा करताना वाहनचालकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेऊन पथ विभागाने गेल्या महिन्यात शहरातील १५ रस्त्यांची डागडुजी केली होती. पथ विभागाने केलेल्या या कामाचे सर्वच स्तरांतून कौतुक झाल्यानंतर पथ विभागाच्या वतीने आणखी १७ रस्ते सुधारण्याची मोहीम हाती घेण्यात आली. रस्ते सुधारण्यासाठी पथ विभागाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला. त्यामुळे आता यापुढील काळात अपवादात्मक परिस्थितीवगळता कोणालाही रस्तेखोदाईसाठी परवानगी दिली जाणार नाही, असे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी जाहीर केले होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शहरातील सुस्थितीत असलेले रस्ते खोदण्याचे काम सुरू आहे. यामध्ये धायरी, मध्यवर्ती पेठांचा भाग असलेल्या विजयानगर कॉलनी, पद्मावती परिसरासह शहरातील इतर भागांतील रस्त्यांचा समावेश आहे.धायरी गावातून डीएसके विश्वकडे जाणारा रस्ता चार दिवसांपूर्वी तयार करून तेथे डांबरीकरण करण्यात आले होते. सोमवारी सकाळी हा रस्ता जेसीबीने खोदण्यास सुरुवात करण्यात आली. नागरिकांनी या कामाबद्दल कामगारांकडे चौकशी केली असता, एका पक्षाच्या माजी नगरसेवकाच्या स्वीय सहायकाचे काम आहे, अशी माहिती देण्यात आली. या ठिकाणी महापालिकेच्या पथ, मलनि:सारण विभागाचे अभियंते उपस्थित नव्हते.पथ विभागाचे उपअभियंता नरेश रायकर, मलनि:सारण विभागाचे निशिकांत छापेकर, शुभम देशमुख यांच्याकडे याबाबत चौकशी करण्यात आली असता, हा रस्ता खोदण्यासाठी कोणतीही परवानगी दिली नसल्याचे सांगण्यात आले. सदाशिव पेठेत विजयानगर कॉलनी येथे नव्याने तयार केलेला रस्ता खोदण्यात आला. हा रस्ता कोणी आणि कशासाठी खोदला याची कोणतीही माहिती पथ विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नव्हती. हा रस्ता नक्की कशासाठी खोदला, याची माहिती त्या विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्याकडून घेतली जाईल, असे पथ विभागाचे अधीक्षक अभियंता साहेबराव दांडगे यांनी सांगितले.रस्तेखोदाई करण्यासाठी कोणालाही परवानगी देण्यात आलेली नाही. बेकायदा रस्ते खोदल्यास खपवून घेतले जाणार नाही. यामध्ये सर्व संबंधितांवर गुन्हा दाखल केला जाईल. तसेच संबंधित बांधकाम व्यावसायिकाची तक्रार बांधकाम विभागाकडेदेखील केली जाईल. शहरातील रस्त्यांवरून ये-जा करताना वाहनचालकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेऊन पथ विभागाने गेल्या महिन्यात शहरातील १५ रस्त्यांची डागडुजी केली होती. पथ विभागाने केलेल्या या कामाचे सर्वच स्तरांतून कौतुक झाल्यानंतर वतीने आणखी १७ रस्ते सुधारण्याची मोहीम हाती घेण्यात आली.

### खोदाईसाठी परवानगी दिली जाणार नाही

रस्ते सुधारण्यासाठी पथ विभागाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला. त्यामुळे आता यापुढील काळात अपवादात्मक परिस्थितीवगळता कोणालाही रस्तेखोदाईसाठी परवानगी दिली जाणार नाही, असे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी जाहीर केले होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शहरातील सुस्थितीत असलेले रस्ते खोदण्याचे काम सुरू आहे.

# अनाथालय, वृद्धाश्रमात मिळाला ‘आपुलकीचा अक्षय गोडवा’!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा विधायक उपक्रम

### शहरात विविध संस्थांमध्ये 1000 डझन आंब्यांचे वाटप

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**“दादा तू आला आणि कुणाला आपल्या आईची आठवण आली... तर कुणाला दूर परदेशात असलेल्या मुलांची...कुणाच्या चेहऱ्यावर हसू उमटले... किमान आजचा एक दिवसतरी..! तुझ्याकडून अशीच लोकांची, वंचितांची सेवा घडो...असा अशिर्वाद देते..बाळा खूप मोठा हो...” हे हृदयस्पर्शी शब्द आहेत, एका वृद्धाश्रमातील आजीचे..! निमित्त होते आंबा महोत्सव.**








समाजातील दुर्लक्षित आणि निराधार व्यक्तींसोबत सण-उत्सव साजरा झाला पाहिजे. या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून “आंबा महोत्सव” साजरा करण्यात आला.

“गोडवा आपुलकीचा, अक्षय समाजसेवेचा” या संकल्पनेतून शहर आणि परिसरातील वृद्धाश्रम, अनाथाश्रम, दिव्यांग भवन, अंध शाळा असे एकाच दिवशी तब्बल 30 ठिकाणी अबालवृद्धांनी आंब्यांचा आस्वाद घेतला. 1000 हून अधिक डझन आंबे वाटप करण्यात आले. वडिलधारी मंडळी आणि समाजातून दुर्लक्षीत असलेल्या निराधारांसोबत हा सण साजरा करण्यात आला. विविध स्तरातून या उपक्रमाचे कौतूक होत आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला. प्रमुख ठिकाणी आमदार लांडगे यांनी स्वत: सहभाग घेत अबालवृद्धांसोबत काही क्षण आनंदात साजरे केले. आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात मानवतेच्या दृष्टीकोनातून प्रत्येकाने खारीचा वाटा म्हणून सामाजिक कार्य करावे, असा संदेश यानिमित्ताने देण्यात आला.

### पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली..!

पहलगाम येथे झालेल्या आंतकवादी हल्ल्याचा निषेध आणि बळी गेलेल्या निष्पाप हिंदू बांधवांना श्रद्धांजलीही वाहण्यात आली. देशभक्तीपर गीते आणि भारताची एकता टिकवण्यासाठी सर्वांनी भारतीय म्हणून एकत्र आले पाहिजे, असा संकल्प करण्यात आला आणि आंबा महोत्सवाची सुरूवात केली. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसोबत आमदार लांडगे यांनी आमसर-पुरी भोजनाचा आस्वाद घेतला. त्यांच्याशी संवाद साधला आणि यापुढील काळात आपला मुलगा, बंधू आणि कुटुंबाचा सदस्य म्हणून सर्वोतोपरी मदतीसाठी तत्पर राहील, असा विश्वासही दिला.

> पिंपरी-चिंचवड शहरातील “आंबा महोत्सव” साजरा करताना आम्हाला विशेष आनंद झाला. सामाजिक जाणिवेचा संदेश देत हा महोत्सव साजरा करताना मला विशेष आनंद वाटतो. कारण, समाजापासून अलिप्त असलेल्या या अनाथालयातील मुलांच्या चेहऱ्यावर या निमित्ताने हसू आणि वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधान पहायला मिळाले. अबालवृद्धांसोबत आमरस- पुरी भोजनाचा आस्वाद घेतला. हा आंबा महोत्सव यापुढील काळातही प्रतिवर्षी कायम ठेवण्याचा संकल्प आम्ही केला आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

# ग्रामस्थ, नागरिकांच्या तक्रारी ऐकून घ्या!

## पीएमआरडीए आयुक्तांचा निर्णय; नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेण्यासाठी अधिकाऱ्यांची उपस्थिती बंधनकारक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी, चिंचवड - पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए) हद्द मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे वेगवेगळ्या नऊ तालुक्यांतून नागरिक, ग्रामस्थ हे विविध कामासाठी पीएमआरडीएमध्ये येत असतात. मात्र, अनेकदा या ठिकाणी आल्यावर त्यांना अधिकाऱ्यांची भेट होत नाही. त्यामुळे महानगर आयुक्तांनी नागरिकांना भेटण्यासाठी अधिकाऱ्यांना वेळ ठरवून दिल्या आहेत.**





अनेकदा त्यावेळी अधिकारी जागेवर नसतात. त्यामुळे आता संबंधित अधिकाऱ्याविरोधी तक्रार प्राप्त झाल्यास कारवाई करण्यात येईल, असे प्रशासन विभागाकडून सांगण्यात आले आहे. नागरिकांच्या अडचणी, तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कामकाजात सुलभता आणण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुरु आहेत. त्याच अनुषंगाने अधिकाऱ्यांच्या भेटण्याच्या वेळा ठरविण्यात आल्या होत्या. मात्र, तरीही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने पीएमआरडीए प्रशासनाकडून त्याबाबत कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. प्रत्यक्षात सोमवार ते गुरुवार या चार दिवसांत संबंधित विभागाचे मुख्य अधिकारी हे नागरिकांसाठी उपलब्ध असतील.

कामातील अडचणी, समस्या अथवा त्या विभागाच्या तक्रारीच्या अनुषंगाने भेटता येईल. तर, विकास परवानगी विभागात नागरिकांना काम होत नसल्याने हेलपाटे मारावे लागत होते. त्यानुसार, सहायक नगररचनाकार हे उपलब्ध असतील. तसेच, इतर विभागातील उपायुक्त व कार्यकारी अभियंता देखील या वेळेत नागरिकांच्या सेवेसाठी असणार आहेत. त्याचप्रमाणे नागरिकांना थेट आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे तक्रारी मांडता येणार आहे. त्यामुळे संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी याची नोंद घेण्याबाबत सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. अन्यथा, आयुक्तांकडून आलेल्या परिपत्रकानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

> “नागरिकांच्या तक्रारी, त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळा ठरविल्या आहेत. अधिकारी वर्गाने त्यावेळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्याबाबतच्या तक्रारी आल्यास आयुक्तांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात येईल.”
>
> **-पूनम मेहता** (सह आयुक्त - प्रशासन विभाग, पीएमआरडीए)

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### तळमळ लागली म्हणजे संत भेटतो

असंताची आवड नाहीशी होईल तेव्हाच संत हवासा वाटेल. विषय आपल्याला त्रास देतात, पण ते सोडावे कसे हे समजत नाही. जंगलात सापडलेल्या माणसाप्रमाणे आपले झाले आहे. आपली वाट चुकली आहे असे ज्याला वाटेल तोच जंगलातून बाहेर पडण्याची वाट विचारतो. 'आता वय फार झाले, काळाच्या स्वाधीन होण्याची वेळ आली, रामा तूच आता तार,' अशी तळमळ लागली, तरच संतसहवास लाभेल. सत्संगत हवी असे आपण म्हणतो खरे, पण मागतो मात्र 'असत्'; मग आपल्याला सत्संगत कशी मिळेल ? स्वतःला कसे विसरावे हे कळण्याकरताच संताला शरण जावे. आपले विस्मरण म्हणजे भगवंताचे स्मरण. वडील दूर आहेत, त्यांचे पत्र नाही, म्हणून काळजी करतो; पण जन्मापासून भगवंत दूर आहे, त्याची तळमळ का लागू नये ? आपण नामस्मरण करतो, पण ज्याचे नाम घेतो तो कोण, असा विचार करतो का? विषय सोडल्याशिवाय राम कसा भेटणार ? रामही हवा आणि विषयही हवा, हे जुळणार कसे ? मला जोपर्यंत चिमटा घेतलेला कळतो तोपर्यंत कर्ममार्गानेच जाणे जरूर आहे. कर्ममार्ग सांभाळताना, 'कर्ता मी नव्हे' ही भावना सांभाळणे जरूर आहे. जो खरा अनुभवी आहे तो बोलणारच नाही, आणि बोललाच तर तो अगदी थोडे बोलेल; तो उत्तम होय. अनुभवी खरा, पण नाइलाज म्हणून जो बोलतो तो त्याच्यापेक्षा थोडा कमी समजावा. कोणीतरी बोलल्याशिवाय लोकांना कळणार कसे, म्हणून हे लोक कमीपणा पत्करूनही पुष्कळ बोलतात. परंतु अनुभव नसताना उगीच शब्दपांडित्य करणारे हे अगदी खालच्या दर्जाचे होत. ज्याला अनुभव कमी त्याला शब्दपांडित्य फार असते. जो जगाला फसविणार नाही आणि स्वतःही फसणार नाही, असाच मनुष्य जगाला मार्गाला लावू शकेल. कित्येक साधू दगड मारतात किंवा शिव्या देतात, तरी लोक त्यांच्या मागे लागतात, कारण त्यांच्या शिव्यादेखील आशीर्वादाप्रमाणे असतात. हे कित्येक लोकांच्या ध्यानी येत नाही. एखादा मुलगा बापाला म्हणू लागला की, 'मी इतका जवळचा, पण मला मिळतो मार; आणि तो लांबचा पोर, त्याचे मात्र लाड !' पण तो मारच आपल्या हितासाठी असतो, हे त्याला नाही समजत ! साधूच्या बोलण्यामध्ये किंवा मारण्यामध्येसुद्धा दुष्ट बुद्धी नसते. संत जे काही बोलतील ते जगाच्या कल्याणाकरताच असते. संत निःस्वार्थी असतात. त्यावर आपण श्रद्धा ठेवली पाहिजे. संतांच्या सांगण्याचा खरा अर्थ आचरणानेच कळेल.

**बोधवचन:- संतांच्या संगतीत आपण गेलो की आपले कर्तृत्व संपले.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# प्रत्यक्ष युद्धात पाकिस्तान तग धरणार का मरणार ?

**भारत पाकिस्तानच्या सीमेवर युद्धाचे ढग तरंगत आहेत. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानचा बदला घेण्यासाठी संपूर्ण भारतातून मोदी सरकारवर दबाव येत असून भारताची युद्ध यंत्रणा देखील सज्ज झाली आहे. जर युद्ध झालेच तर पाकिस्तान भारतासमोर किती दिवस तग धरणार का सबसे हाराकिरी पत्करून मरणार हा खरा प्रश्न आहे.**



### क्षेपणास्त्राच्या चाचण्या !

भारताने युद्धाची जय्यत तयारी केली असून उच्चस्तरीय अनेक बैठका सुरू आहेत. पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या देशात परतण्यासाठी दिलेली मुदतही संपली आहे. भारताची लढाऊ जहाजे समुद्रात पाकिस्तानच्या सीमेजवळ जाऊन उभी आहेत.. आता, पहिले क्षेपणास्त्र सोडण्यासाठी आवश्यकता आहे ती पहिल्या आदेशाची !

### हल्ल्यानंतर मुसक्या आवळल्या..

पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यामध्ये २६ हिंदू पर्यटकांचा मृत्यू झाला, या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर मोठी कारवाई केली आहे, भारताने पाकिस्तानच्या मुसक्या आवळल्या आहेत, भारताने पंचप्रहार केले, त्यामध्ये सिंधू नदी कराराला स्थगिती दिली गेली. अटारी-वाघा बॉर्डरदेखील बंद करण्यात आली, तसेच पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले. तातडीने अनेक पावले उचलली गेली.

### पाकिस्तानचा फक्त जळफळाट..

सिंधू नदी पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आल्यामुळे पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे. पाकिस्तानच्या पंतप्रधानांपासून ते लष्कर प्रमुखांपर्यंत युद्धाच्या पोकळ धमक्या देण्यात येत आहेत. यामुळे तणावाची स्थिती तर निर्माण झाली आहेच. पण, सीमेवर हालचाली वाढल्या आहेत.

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झालेच तर पाकिस्तान भारतासमोर किती दिवस टिकू शकते? संरक्षणतज्ज्ञ काय म्हणतात ? भारताच्या लष्करी सामर्थ्याला तोंड देण्याची पाकिस्तानची क्षमता आहे का ? हा मुख्य प्रश्न विचारला जात आहे.

### संरक्षणतज्ज्ञांना काय वाटते?

पाकिस्तानी संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ कमर चिमा यांनी या संदर्भात मोठे वक्तव्य केले आहे. पाकिस्तानने भारतासाठी आपली हवाई हद्द बंद केली आहे. यामागे पाकिस्तानचा असा उद्देश आहे की, भारताच्या कोणत्याच विमानाला पाकिस्तानी हवाई हद्दीत प्रवेश द्यायचा नाही. मात्र, तशी स्थिती निर्माण झाल्यास परिस्थिती आणखी चिघळू शकते. दुसरीकडे भारताने सुद्धा तयारी सुरू केलेली आहेच. भारताकडून 'आयएनएस विक्रांत' ला समुद्रात तैनात करण्यात आले आहे. भारताच्या हवाईदलाने युद्धाभ्यास सुरू केला आहे. या सर्व गोष्टीवर पाकिस्तान नजर ठेवून आहे, असे चिमा यांनी म्हटले आहे.

### पाकिस्तान हल्ल्याच्या प्रतीक्षेत..

भारत आज ना उद्या हल्ला करणार याची कल्पना पाकिस्तानला आहे, त्यामुळे त्यांनी सुद्धा हल्ल्याला सडेतोड उत्तर देण्यासाठी आणि भारताचे हल्ले परतवण्यासाठी संपूर्ण नियोजन आणि तयारी केली आहे, हे सीमा यांचे शब्द बरेच काही सांगून जातात. भारताकडून युद्धाच्या पार्श्वभूमीवर हालचाली वाढल्या आहेत, सैन्यांच्या हालचाली आणि त्या संबंधित बातम्या देऊ नका, असे आदेश भारत सरकारने सर्व प्रसार माध्यमांना दिले आहेत. याचाच अर्थ असा, की हे प्रकरण गंभीर आहे. भारत सीमेवर सैन्याची जुळवाजुळव करत असून संख्या वाढवत आहे. या परिस्थितीमध्ये भारत आणि पाकिस्तान युद्ध झाले तर पाकिस्तान भारतासमोर फार काळ दम धरू शकणार नाही. अर्थात् चिमा यांनीच हे मान्य केले आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगून टाकले आहे की सध्या पाकिस्तानकडे शस्त्र आणि पैसा पुरेशा प्रमाणात नाही, त्यामुळे हे युद्ध दीर्घकाळ चालेल असे मला वाटत नाही. भारताला सुद्धा पाकिस्तानची परिस्थिती कशी आहे, हे चांगलेच माहिती आहे, असे चिमा यांनी म्हटले आहे.

### एकदा होऊन जाऊ द्या..

दरवेळी पाकिस्तानने काहीतरी आगळीक करायची. पुलवामा, उरी एवढेच काय कारगिल सारखे हल्ले करायचे आणि नंतर भारताने त्यांच्यावर कारवाई करायची हे आता ठरलेलेच आहे. पाकिस्तानचे तोंड कायमचे बंद करा, असे सर्व राजकीय पक्षांनी पंतप्रधान मोदी यांना सांगितले असून त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानची लष्करी ताकद किती ? याबाबत रोजच चर्चा सुरू असून केवळ तीन दिवस पुरेल एवढा दारूगोळा पाकिस्तानकडे असल्याचे सांगितले जात आहे.

### अद्दल शिकवण्याची हीच वेळ !

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने अतिशय कडक पावले उचलली आहे, आणि पाकिस्तानवर दबाव टाकण्यासही सुरुवात केली आहे. पाकिस्तानची लष्करी ताकद आपल्या आवाक्याबाहेर नाही हे लक्षात आल्यानंतर भारताचे अधिकारी जास्तच आक्रमक झाले आहेत. आता युद्ध होऊन जाऊ द्या, पाकिस्तानला कायमची अद्दल घडवू या.. असे संपूर्ण भारतीयांचे म्हणणे आहे. आता, पाहू या मोदी सरकार कोणती कडक कारवाई करणार आणि पाकिस्तानला गुडघ्यावर रांगायला लावणार ते !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पाणी बंद करायला 20 वर्षे लागतील!

## आमदार विजय वडेट्टीवारांचा मोदी सरकारला टोला




**।मुंबई।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात तणावाचं वातावरण आहे. हा हल्ला म्हणजे केंद्र सरकार व गुप्तचर यंत्रणा देशाला सुरक्षा पुरवण्यात सपशेल अपयशी ठरल्याचं उदाहरण असल्याची टीका विरोधक करत आहेत. दरम्यान, दहशतवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानविरोधात केंद्र सरकार आक्रमक झालं आहे. भारताने उभय देशांमधील सिंधू जलकरार स्थगित केला आहे. तर, भाजपा व त्यांच्या मित्रपक्षांमधील नेते पाकिस्तानचं पाणी बंद करण्याबाबत वक्तव्ये करत आहेत. मात्र, पाकिस्तानचं पाणी बंद करायला केंद्र सरकारला २० वर्षे लागतील असं वक्तव्य काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी केलं आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या प्रसारमाध्यमांसमोर म्हणाले होते की "भारत-पाकिस्तान युद्ध होऊ नये". त्यावर भाजपाने पलटवार करत म्हटलं की "हे लोक (काँग्रेस) पाकिस्तानची भाषा बोलू लागले आहेत". त्यावर विजय वडेट्टीवार म्हणाले, "तुमची (मोदी सरकार) युद्ध करायची तयारी असेल तर करा. पाकिस्तानने तर थेट युद्धाचं आव्हान केलं आहे".काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, "एखादे मुख्यमंत्री काहीतरी म्हणाले म्हणून पंतप्रधानांची भाषा बदलू शकते का? ठीक आहे, सिद्धरामय्या म्हणाले असतील की युद्ध नको. परंतु, तुमची (केंद्र सरकार) युद्धाची तयारी आहे का? तुमची युद्धाची तयारी असेल तर तुम्ही युद्ध करा. पाकिस्तानने युद्धाचं खुलं आव्हान दिलं आहे. तुम्ही लोक समझोत्याची भाषा करता तेव्हा ती कोणाची भाषा असते? ती पाकिस्तानची भाषा असते का? उभय देशांमध्ये आज काय स्थिती आहे पाहा. हे जुनंच युद्ध आहे."काँग्रेसचे आमदार म्हणाले, "युद्ध कोणाच्या फायद्याचं असतं का? युद्धाने केवळ मोठं नुकसान होतं. तुम्ही काहीही बोलता आणि पसरवता. तुम्ही लोक पाकिस्तानचं पाणी बंद करायची भाषा करता. अरे तुम्हाला पाकिस्तानचं पाणी बंद करायला २० वर्षे लागतील. ते पाणी अडवण्यासाठी नद्यांवर धरणं बांधावी लागतील. हे लोक केवळ लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी, त्यांना भरकटवण्यासाठी काहीही बाता मारत आहेत."कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या प्रसारमाध्यमांसमोर म्हणाले होते की "भारत-पाकिस्तान युद्ध होऊ नये".

त्यावर भाजपाने पलटवार करत म्हटलं की "हे लोक (काँग्रेस) पाकिस्तानची भाषा बोलू लागले आहेत". त्यावर विजय वडेट्टीवार म्हणाले, "तुमची (मोदी सरकार) युद्ध करायची तयारी असेल तर करा. पाकिस्तानने तर थेट युद्धाचं आव्हान केलं आहे".काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, "एखादे मुख्यमंत्री काहीतरी म्हणाले म्हणून पंतप्रधानांची भाषा बदलू शकते का? ठीक आहे, सिद्धरामय्या म्हणाले असतील की युद्ध नको. परंतु, तुमची (केंद्र सरकार) युद्धाची तयारी आहे का? तुमची युद्धाची तयारी असेल तर तुम्ही युद्ध करा. पाकिस्तानने युद्धाचं खुलं आव्हान दिलं आहे. तुम्ही लोक समझोत्याची भाषा करता तेव्हा ती कोणाची भाषा असते? ती पाकिस्तानची भाषा असते का? उभय देशांमध्ये आज काय स्थिती आहे पाहा. हे जुनंच युद्ध आहे."काँग्रेसचे आमदार म्हणाले, "युद्ध कोणाच्या फायद्याचं असतं का? युद्धाने केवळ मोठं नुकसान होतं. तुम्ही काहीही बोलता आणि पसरवता. तुम्ही लोक पाकिस्तानचं पाणी बंद करायची भाषा करता. अरे तुम्हाला पाकिस्तानचं पाणी बंद करायला २० वर्षे लागतील. ते पाणी अडवण्यासाठी नद्यांवर धरणं बांधावी लागतील.

### पाकिस्तानने थेट युद्धाचं आव्हान केलं

हे लोक केवळ लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी, त्यांना भरकटवण्यासाठी काहीही बाता मारत आहेत.काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात तणावाचं वातावरण आहे. हा हल्ला म्हणजे केंद्र सरकार व गुप्तचर यंत्रणा देशाला सुरक्षा पुरवण्यात सपशेल अपयशी ठरल्याचं उदाहरण असल्याची टीका विरोधक करत आहेत. दरम्यान, दहशतवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानविरोधात केंद्र सरकार आक्रमक झालं आहे. भारताने उभय देशांमधील सिंधू जलकरार स्थगित केला आहे.

# राज ठाकरे -उद्धव ठाकरे एकत्र येतील का?

## राजला तीन तासांच्या आत उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद दिला: अकोलकर



**।मुंबई।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

दोन आडनावांशिवाय महाराष्ट्राचं राजकारण अधुरं आहे. पहिलं आडनाव आहे ठाकरे दुसरं आडनाव आहे पवार. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांनी महाराष्ट्राला दिशा देण्याचं काम कायमच केलं. शिवसेना हा पक्ष महाराष्ट्रात कायमच चर्चेत राहिला. आता पुन्हा एकदा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येण्याच्या चर्चा रंगल्या आहेत. याचं कारण या दोन ठाकरे बंधूंनी केलेली दोन वक्तव्यं ठरली आहेत.

याबाबत ज्येष्ठ पत्रकार आणि 'जय महाराष्ट्र-हा शिवसेना' नावाचा इतिहास आहे या पुस्तकाचे लेखक प्रकाश अकोलकर यांनी भाष्य केलं आहे.राज ठाकरेंनी एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच एक मुलाखत दिली. त्या मुलाखतीत महाराष्ट्रासाठी आमच्यातलं भांडण खूप छोटं आहे वगैरे म्हणत उद्धव ठाकरेंना टाळी देण्याची भाषा केली. तर उद्धव ठाकरे यांनीही हाळी देऊन भाजपाच्या लोकांना जवळ करु नका अशी एक छोटीशी अट ठेवत राज ठाकरेंशी हातमिळवणीची तयारी दर्शवली. त्यातून या चर्चा सुरु झाल्या. पण राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे खरंच एकत्र येतील का? याचं ठोस उत्तर आज तरी कुणाकडेच नाही."माझा वाद माझ्या विठ्ठलाशी नाही तर त्याच्या आजबाजूला असलेल्या बडव्यांशी आहे. त्यामुळे मी शिवसेनेच्या सगळ्या पदांचा आज राजीनामा देत आहे." असं राज ठाकरेंनी जाहीर करुन पक्ष सोडला. बाळासाहेब ठाकरेंची भेट घेऊन पक्ष सोडला. राज ठाकरेंच्या भाषेत सांगायचं तर त्यांच्या 'विठ्ठलाभोवतीचे बडवे' आजही आहेत. उद्धव ठाकरेंच्या सततच्या वर्चस्वाच्या राजकारणाला कंटाळूनच राज ठाकरेंनी पक्ष सोडला असंही सांगितलं जातं. तर उद्धव ठाकरे यांनीही वारंवार राज ठाकरेंवर अगदी पातळी सोडूनही टीका केली आहे.

### प्रकाश अकोलकर यांचं म्हणणं काय?

अशात राज ठाकरेंनी पुन्हा एकत्र येण्याचं भाष्य करुन टायमिंग साधलं आहे. हे दोन भाऊ एकत्र आले तर नक्कीच एक वेगळं समीकरण महाराष्ट्राच्या राजकारणात पाहण्यास मिळेल."शिवसेनेच्या सहा दशकांच्या कालखंडात बाळासाहेब ठाकरे हयात असतानाच दोन ठाकरे सेना झाल्या. आता तीन झाल्या आहेत. दोन ठाकरे आहेत, तीन सेना आहेत आणि मराठी माणूस कुठे आहे? असा प्रश्न वारंवार विचारावासा वाटतो. गेल्या दहा वर्षांत जे राजकारण बदललं. भाजपा सत्तेवर आल्याने नाही तर मोदी आणि शाह यांच्याकडे सत्तेची सूत्रं गेल्याने ते बदललं असं मला वाटतं. मराठी माणसांचे प्रश्न निर्माण होणं, महाराष्ट्राचं राजकारण बदलणं हे सगळं मोदी आणि शाह यांच्या काळात घडलं आहे." असं प्रकाश अकोलकर यांनी म्हटलं आहे."राज ठाकरेंनी साद घालणं आणि त्यानंतर तीन तासांच्या आत उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद देणं याचा विचार करावा लागेल.

# पर्यटकांना सुरक्षित पाठवणे माझे कर्तव्य!

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्याचा ठराव मंजूर

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सोमवारी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत, याचा निषेध केला. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता, ज्यामध्ये बहुतेक पर्यटक होते. राज्य विधानसभेत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे वेदना व्यक्त करण्यासाठी शब्द नाहीत. त्यांनी सांगितले की, या दुर्घटनेने केवळ पीडितांच्या कुटुंबियांनाच नव्हे तर संपूर्ण देशालाही धक्का बसला आहे. याचबरोबर त्यांनी, २२ एप्रिल रोजी बैसरन खोऱ्यात झालेल्या हल्ल्यातील बळींच्या कुटुंबियांची माफी मागण्यासाठी त्यांच्याकडे शब्द नाहीत, असे म्हटले आहे.**

विधानसभेच्या विशेष अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले, "या घटनेचा संपूर्ण देशावर परिणाम झाला आहे. आपण असे अनेक हल्ले यापूर्वी पाहिले आहेत. पहलगामच्या बैसरणमध्ये २१ वर्षांनंतर इतका मोठा हल्ला झाला आहे. मृतांच्या कुटुंबियांची माफी कशी मागावी हे मला समजत नाही. यजमान असल्याने, पर्यटकांना सुरक्षित परत पाठवणे हे माझे कर्तव्य होते. मी ते मी पार पाडू शकलो नाही. माझ्याकडे माफी मागण्यासाठी शब्द नाहीत."मुख्यमंत्री अब्दुल्ला पुढे म्हणाले की, "काश्मीरच्या मशिदींमध्येही दहशतवादाविरुद्ध निषेध व्यक्त करण्यात आला आहे. ही काश्मीरमधील दहशतवादाच्या अंताची सुरुवात आहे. लोक जेव्हा आपल्याला पाठिंबा देतील तेव्हाच दहशतवाद संपेल. ही त्याची सुरुवात आहे. आपण असे काहीही बोलू नये किंवा दाखवू नये ज्यामुळे या चळवळीला हानी पोहोचेल.

जेव्हा लोक आपल्याला पाठिंबा देतील तेव्हाच दहशतवाद संपेल. आणि आता असे दिसते की लोक त्या टप्प्यावर पोहोचत आहेत."२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगामजवळील बैसरन व्हॅलीमध्ये दहशतवादी



हल्ला झाला होता. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. तर २० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर काश्मीर खोऱ्यातील हा सर्वात घातक हल्ला असल्याचे मानले जाते.

दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्यांपैकी बहुतेक पर्यटक होते.दरम्यान या हल्ल्यामागे पाकिस्तानास्थित संघटना असल्याचे समोर येतार केंद्र सरकारने कठोर कारवाई सुरू केली आहे.

याचाच भाग म्हणून केंद्र सरकारने सर्व पाकिस्तानी नागरिकांना तत्काळ भारत सोडण्याचे आदेश दिले आहे.गेल्या चार दिवसांत अटारी सीमेवरून एकूण ५३७ पाकिस्तानी नागरिकांना परत पाठवण्यात आले आहे. देशभरातील राज्य सरकारे आणि सुरक्षा संस्था याबाबत कारवाई करत आहेत. दुसरीकडे, १४ राजनयिक आणि अधिकाऱ्यांसह एकूण ८५० भारतीय पंजाबमधील आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानातून भारतात परतले आहेत.विधानसभेच्या विशेष अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले, "या घटनेचा संपूर्ण देशावर परिणाम झाला आहे. आपण असे अनेक हल्ले यापूर्वी पाहिले आहेत. पहलगामच्या बैसरणमध्ये २१ वर्षांनंतर इतका मोठा हल्ला झाला आहे. मृतांच्या कुटुंबियांची माफी कशी मागावी हे मला समजत नाही. यजमान असल्याने, पर्यटकांना सुरक्षित परत पाठवणे हे माझे कर्तव्य होते. मी ते मी पार पाडू शकलो नाही. माझ्याकडे माफी मागण्यासाठी शब्द नाहीत.

"मुख्यमंत्री अब्दुल्ला पुढे म्हणाले की, "काश्मीरच्या मशिदींमध्येही दहशतवादाविरुद्ध निषेध व्यक्त करण्यात आला आहे. ही काश्मीरमधील दहशतवादाच्या अंताची सुरुवात आहे. लोक जेव्हा आपल्याला पाठिंबा देतील तेव्हाच दहशतवाद संपेल. ही त्याची सुरुवात आहे. आपण असे काहीही बोलू नये किंवा दाखवू नये ज्यामुळे या चळवळीला हानी पोहोचेल. जेव्हा लोक आपल्याला पाठिंबा देतील तेव्हाच दहशतवाद संपेल.

### 537 पाकिस्तानींना पाठवण्यात आले

आणि आता असे दिसते की लोक त्या टप्प्यावर पोहोचत आहेत."२२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगामजवळील बैसरन व्हॅलीमध्ये दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. तर २० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर काश्मीर खोऱ्यातील हा सर्वात घातक हल्ला असल्याचे मानले जाते. दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्यांपैकी बहुतेक पर्यटक होते.दरम्यान या हल्ल्यामागे पाकिस्तानास्थित संघटना असल्याचे समोर येतार केंद्र सरकारने कठोर कारवाई सुरू केली आहे. याचाच भाग म्हणून केंद्र सरकारने सर्व पाकिस्तानी नागरिकांना तत्काळ भारत सोडण्याचे आदेश दिले आहे.गेल्या चार दिवसांत अटारी सीमेवरून एकूण ५३७ पाकिस्तानी नागरिकांना परत पाठवण्यात आले आहे. देशभरातील राज्य सरकारे आणि सुरक्षा संस्था याबाबत कारवाई करत आहेत.

# मोदी पाकिस्तानचे चार तुकडे करतील!

## खासदार दुबे यांनी पाकिस्तानबाबत केलेलं विधान चर्चेत

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**काश्मीरमधल्या पहलगाम या ठिकाणी जो दहशतवादी हल्ला झाला त्यामुळे संपूर्ण देश हादरला आहे. या हल्ल्यानंतर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. संपूर्ण जगाने या भ्याड हल्ल्याचा निषेध नोंदवला आहे. या हल्ल्यात २६ जणांचा जीव गेला. हे सगळे निरपराध पर्यटक होते. दरम्यान भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी २०२५ संपेपर्यंत पाकिस्तानचे चार तुकडे करतील असा दावा केला आहे.**

पहलगाममध्ये जो दहशतवादी हल्ला झाला त्यात २६ भारतीय पर्यटकांना जीव गमवावा लागला. ही घटना दुर्दैवी आहे.





मात्र आपल्या सुदैवाने देशाचं नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. पाकिस्तानला ते नक्की धडा शिकवतील. १४० कोटी भारतीयांचा पाठिंबा त्यांच्या पाठिशी आहे. तसंच मोदींच्या नावाचा डंका जगभरात वाजत असतो. या दहशतवाद्यांना आम्ही कल्पनेपलिकडची शिक्षा देऊ असं म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जी घोषणा केली त्यामुळे दहशतवाद्यांचं धाबे दणाणले आहेत असंही निशिकांत दुबेंनी म्हटलं आहे.मी खात्रीने सांगतो आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी २०२५ वर्षे संपेपर्यंत पाकिस्तानचे चार तुकडे करतील.

बलुचिस्तान, पख्तूनिस्तान, पंजाब आणि सिंध असे प्रांत करुन पाकिस्तानचे चार तुकडे केले जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे करुन दाखवतील." असा दावा निशिकांत दुबेंनी केला आहे. निशिकांत दुबे पुढे म्हणाले,"आता या सापांना पाणी पाजण्याची नाही तर त्यांना चिरडण्याची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात दहशतवादाविरोधात कठोर पावलं उचलली जातील. तसंच लवकरच मोदींच्या नेतृत्वात पाकिस्तानचे चार तुकडे केले जातील" असा दावा निशिकांत दुबेंनी केला आहे.

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याला आज (28 एप्रिल) आठवडा पूर्ण झाला आहे.

तर दुसरीकडे या भ्याड हल्ल्याचे अनेक पैलू समोर येत आहे. अशातच या प्रकरणाच्या तपासाला आता अधिक वेग प्राप्त झाला आहे. दरम्यान, राष्ट्रीय तपास यंत्रणेने गुन्ह्याच्या ठिकाणाचे डिजिटल मॅपिंग केले असून NIA ने घटनास्थळावरून गोळा केलेले नमुने आता न्यायवैदयक प्रयोगशाळेला पाठवण्यात आले आहे. तसेच बैसरन व्हॅलीला जाणाऱ्या रस्त्यांवरील हॉटेल आणि मार्केट परिसरातील CCTV ही ताब्यात घेतले असून त्याची तपासणी सुरु झाली आहे.

### हल्ल्याला एक आठवडा पूर्ण

पहलगाममध्ये जो दहशतवादी हल्ला झाला त्यात २६ भारतीय पर्यटकांना जीव गमवावा लागला. ही घटना दुर्दैवी आहे. मात्र आपल्या सुदैवाने देशाचं नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. पाकिस्तानला ते नक्की धडा शिकवतील. १४० कोटी भारतीयांचा पाठिंबा त्यांच्या पाठिशी आहे.

# स्टार अभिनेत्रीशी लग्न करून आयुष्य बदललं?

माधुरी दीक्षित व डॉ. श्रीराम नेने यांचा विवाहसोहळा १९९९ मध्ये अमेरिकेत पार पडला होता. त्याकाळी 'धकधक गर्ल' हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री होती. त्यामुळे बॉलीवूडच्या स्टार अभिनेत्रीशी लग्न केल्यावर आयुष्य कसं बदललं? असा प्रश्न डॉ. नेनेंना रणवीर अलाहबादियाने त्याच्या पॉडकास्टमध्ये विचारला होता. माधुरीचे पती डॉ. नेने यांनी काही महिन्यांपूर्वी रणवीर अलाहबादियाच्या पॉडकास्टमध्ये उपस्थिती लावली होती. यावेळी त्यांनी प्रोफेशनल व





वैयक्तिक आयुष्याबद्दलच्या अनेक गोष्टींबाबत खुलासा केला.माधुरी दीक्षितला ९० च्या दशकातील आघाडीची अभिनेत्री म्हणून ओळखलं जायचं. त्यांच्याशी लग्न झाल्यावर आयुष्य कसं बदललं? भारतात तुम्ही विशेष प्रसिद्धीझोतात आलात का? याविषयी डॉ. नेने म्हणाले, "भारतात काय अमेरिकेत सुद्धा अशीच परिस्थिती होती. कारण, तिला सर्वत्र ओळखलं जायचं. पण, मी कधीच तिच्याकडे एक अभिनेत्री म्हणून पाहिलं नाही कारण, ती माझी पत्नी आहे, माझी जोडीदार आहे."डॉ. नेने पुढे सांगतात,"माधुरी अभिनेत्री सर्वांसाठी आहेच पण, माझ्यासाठी ती माझी जोडीदार आणि माझी पत्नी आहे. लग्नानंतर आपला जोडीदार हा खूप महत्त्वाचा असतो. कारण, आयुष्यातील प्रत्येक गोष्टीत आपण एकमेकांना साथ देणं गरजेचं असतं. मला तिचा भूतकाळ माहिती नाही आणि तिलाही माझ्या भूतकाळाबाबत काहीच माहीत नव्हतं.

# स्वानंदी टिकेकर पुन्हा रंगभूमीकडे

मराठी रंगभूमीवरचा एक अविस्मरणीय ठेवा म्हणजे पु. ल. देशपांडे यांचं 'सुंदर मी होणार' हे नाटक तब्बल तीस वर्षांनंतर पुन्हा रंगभूमीवर येत आहे. निमित्त आहे पुलंचा २५ वा स्मृतिदिन आणि त्यांच्या पत्नी, लेखिका सुनीताबाई देशपांडे यांचं जन्मशताब्दी वर्ष. या खास पर्वावर सादर होणाऱ्या नव्या प्रयोगात 'बेबीराजे' ही महत्त्वाची भूमिका साकारतेय अभिनेत्री स्वानंदी टिकेकर. स्वानंदी जवळपास तीन वर्षांनंतर व्यावसायिक मराठी रंगभूमीवर पुनरागमन करत आहे. याआधी '१०३', 'डोंट वरी बी हॅपी' सारख्या लोकप्रिय नाटकात झळकलेली ही अभिनेत्री, सध्या हिंदीतील 'महानगर के जुगनू' आणि इंग्रजीत 'मिडल क्लास ड्रिम्स ऑफ समर नाईट' या दोन नाटकांत भूमिका साकारत आहे. मात्र 'सुंदर मी होणार'च्या निमित्ताने ती पुन्हा एकदा मराठी रंगभूमीकडे वळली आहे."मला निर्माता आकाश भडसावळेचा फोन आला, आणि त्याने विचारलं – 'नाटक करणार का?' त्याचवेळी त्याने या नाटकाचं नाव सांगितलं आणि मला वाटलं, इतकी सुंदर संहिता आणि तेही पुलंचं नाटक – मी नाही म्हणण्याचा विचारच करू शकले नाही," असं स्वानंदी सांगते. पुलंच्या लेखणीबद्दल असलेला आदर आणि त्यांच्या नाट्यसंहितेची ताकद तिच्या शब्दांमधून सहज उमटत होती. 'बेबीराजे' ही व्यक्तिरेखा तिच्या अंतर्मनाच्या अगदी जवळची आहे. ही व्यक्तिरेखा थोडीशी बंडखोर, मतस्वातंत्र्य असलेली, आणि आत्मभान जपणारी आहे – म्हणजेच आजच्या काळाशी पूर्णतः सुसंगत. "बेबीराजे नेमकी माझ्यासारखी वाटते. तिची स्वतःची मतं आहेत. ती आपलं काहीतरी वेगळं शोधू पाहते. जे आपल्याला सहज मिळालंय, त्याच्या पलीकडेही काही आहे का, हे शोधणारी ती म्हणूनच मला ही भूमिका फारच भावली," असं स्वानंदी भावनिक स्वरात म्हणाली. पुलंच्या



नाटकात काम करणं ही तिच्यासाठी केवळ कलात्मक संधी नाही, तर श्रद्धेचा अनुभव आहे. "मी हे नाटक पाहिलं होतं, पण वाचलं नव्हतं. आणि आता पुलंच्या स्वतःच्या हातून लिहिलेल्या ओळी रंगमंचावर बोलता येणार आहेत, ही कल्पनाच खूप पवित्र वाटते," असेही ती नम्रतेने मान्य करते. 'बेबीराजे' ही केवळ एका घरातल्या मुलीची गोष्ट नाही – ती नव्या विचारांची, सामाजिक चौकटी मोडण्याच्या प्रयत्नांची गोष्ट आहे. आजची तरुणाई ज्या संघर्षांमधून स्वतःचं वेगळं स्थान शोधते, त्याच दिशेचा प्रवास या व्यक्तिरेखेचा आहे. म्हणूनच ही भूमिका नाकारणं तिच्यासाठी शक्यच नव्हतं. या नाटकाचं दिग्दर्शन अनुभवी दिग्दर्शक राजेश देशपांडे करणार आहेत. देशपांडे यांनी यापूर्वीही पु. ल. देशपांडे यांचं 'ती फुलराणी'चं दिग्दर्शन केलं आहे. त्याचबरोबर भाषाप्रभू वसंत कानेटकर यांचं 'हिमालयाची सावली' याही नाटकांचं दिग्दर्शन करून त्यांनी कानिटकरी भाषेला न्याय दिला आहे. त्यांचा रंगभूमीवरील अनुभव 'सुंदर मी होणार'च्या नव्या सादरीकरणात मोठा विश्वास निर्माण करतो.नाटकाची निर्मिती करण देसाई आणि आकाश भडसावळे यांनी केली आहे. नाटकात स्वानंदी (बेबीराजे) सोबत आस्ताद काळे (संजय), श्रुजा प्रभुदेसाई (दीदीराजे) यांसारखे कसलेले कलाकार काम करत आहेत. त्यांच्या जोडीने 'मुलगी झाली हो' मालिकेतून घराघरात पोहोचलेला नवा आश्वासक चेहरा सृजन देशपांडे, श्रुती पाटील, निलेश दातार ही नट मंडळी साहाय्यक भूमिकांतून दिसणार आहेत. संगीताची जबाबदारी मिलिंद जोशी, नेपथ्य संदेश बेंद्रे, वेशभूषा मंगल केंकरे यांच्याकडे असून, व्यवस्थापनाची धुरा नितीन नाईक यांनी सांभाळली आहे.

अभिनेत्री अक्षया नाईकने 'ये रिश्ता क्या कहलाता है' तसेच 'सुंदरा मनामध्ये भरली' या मालिकांमध्ये केले आहे. तिच्या या मालिकांतील भूमिकांना प्रेक्षकांचे विशेष प्रेम मिळाले.आता अभिनेत्रीने एका मुलाखतीत कलाकारांनी मालिकेत काम करणे का महत्वाचे आहे, यावर वक्तव्य केले आहे. याबरोबरच, कलाकारांच्या दिसण्याबाबतही अक्षयाने केलेले वक्तव्य सध्या चर्चेत आहे. नुकतीच अभिनेत्रीने 'मुक्काम पोस्ट मनोरंजन' या युट्यूब चॅनेलाल मुलाखत दिली.या मुलाखतीत अक्षया नाईक म्हणाली, "मला असे बरेचसे कलाकार माहित आहे, ज्यांचं म्हणणं असं असतं की आम्हाला मालिकेत काम करायचं नाही. आम्ही ओटीटीवरच काम करणार. आम्ही चित्रपटात काम करणार, मालिकेत काम करणार नाही, असं त्यांचं म्हणणं असतं. पण, मला स्वत:ला असं वाटतं की प्रत्येक कलाकाराने एकदा तरी, कमीत कमी सलग तीन महिने मालिकेत काम केलेच पाहिजे."अभिनेत्री पुढे म्हणाली, "मालिकेत काम केल्याने तुमची सगळ्या प्रकारची चाचणी होते. शारीरिक, भावनिक, मानसिक, सामाजिक अशा सगळ्या पातळ्यांवर तुमची टेस्ट होते. कारण-१२ तासांची शिफ्ट असते. कुठल्याच इंडस्ट्रीमध्ये १२ तास काम करत नाहीत. फक्त आपल्या इंडस्ट्रीमध्ये १२ तास काम होतं. बारा तासातील कमीत कमी ८ तास तुम्ही सेटवर उभे राहणार आहे. त्यामुळे शरीराने तुम्हाला साथ देणे गरजेचे असते." अक्षया नाईक पुढे म्हणाली, "लोक असे म्हणतात की कलाकार आहेत तर डाएट करतात, जीमला जातात. तर कलाकाराची ती रज आहे. आम्हाला हे करावे लागते. आम्ही पार्लर जातो, हेअर स्पा करतो. तर लोक म्हणतात हे कलाकार मेकअप करतात. पण, जर एखादा कलाकार सामाजिक नियमांप्रमाणे जर चांगला दिसत नसेल, त्याला नावे ठेवली जातात."दरम्यान, अक्षया नाईकने या मुलाखतीत सोशल मीडियावरबाबत वक्तव्य केले आहे. सोशल मीडिया सध्या काळाजी गरज असल्याचे अभिनेत्रीने म्हटले आहे. अक्षया नाईक सोशल मीडियावर सक्रिय असते. सोशल मीडियाच्या माध्यमातून ती प्रेक्षकांच्या भेटीला येते. मालिकांसह अभिनेत्री नाटकातदेखील काम करताना दिसली आहे. आता आगामी काळात अभिनेत्री कोणत्या प्रोजेक्टमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# लोक म्हणतात हे कलाकार मेकअप करतात

# राजस्थान रॉयल्सचा 'वैभव' शाली विजय!

## वैभवचं शतक पाहून द्रविडने जागेवर मारली उडी



**।नवी दिल्ली ।प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**वैभव सूर्यवंशीच्या वादळी शतकी खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२५ मध्ये राजस्थान रॉयल्सला अनोखा विजय मिळवून दिला आहे. सलामीला आलेल्या वैभव सूर्यवंशीने अनोखी फलंदाजी करत सर्व गोलंदाजांची धुलाई करत ३५ चेंडूत शतक झळकावलं. वैभवची स्फोटक फलंदाजी पाहून राजस्थानचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आनंदाने उत्साहित झाले.**

एवढंच नाही तर या धाडसी खेळीनंतर राहुल यांनी अक्षरश: स्वत:ची दुखापत विसरून उडीच मारली. ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.वैभव सूर्यवंशीने क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव सोनेरी अक्षरात उमटवले आहे. त्याने गुजरात टायटन्सविरुद्ध ३८ चेंडूत १०१ धावांची खेळी केली. वैभव सूर्यवंशीने २६५.७८ च्या स्ट्राईक रेटने या धावा केल्या, ज्यामध्ये ७ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता. त्याने फक्त ३५ चेंडूत हे शतक पूर्ण केले. यासह, तो आयपीएलमध्ये सर्वात जलद शतक करणारा भारतीय फलंदाजही बनला. यापूर्वी हा विक्रम युसूफ पठाणच्या नावावर होता. २०१० मध्ये राजस्थान रॉयल्सकडून मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळताना त्याने हे शतक झळकावले होते. आता १५ वर्षांनंतर, वैभव सूर्यवंशीने त्याला मागे टाकले आहे.वैभवची स्फोटक फलंदाजी पाहून राजस्थानचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड खूप आनंदी झाले होते. एवढेच नाही तर या धाडसी खेळीनंतर राहुलने जागेवरून उडी मारली.

आयपीएलपूर्वी राहुल द्रविड यांच्या पायाला दुखापत झाली होती, ज्यामुळे ते व्हीलचेअरवर दिसले आहेत. तर सामन्यादरम्यान ते खुर्चीवर बसतात. वैभव सूर्यवंशीच्या शतकाचं सर्वाधिक



सेलिब्रेशन राहुल द्रविड यांनी केलं.

वैभव सूर्यवंशी ९४ धावांवर असताना त्याने षटकार लगावत दणक्यात आपलं शतक पूर्ण केलं. वैभवने शतक पूर्ण करताच राहुल द्रविड उत्साहात आणि आनंदात आपल्या जागेवरून ताडकन् उठले. पण यादरम्यान त्यांनी अचानक दोन्ही पायांवर जोर दिल्याने ते पडणार होतेच पण त्यांनी लगेच पकडून स्वत:ला सावरलं आणि दोन्ही हात वर करत वैभवला जोरात टाळ्या वाजवत शुभेच्छा दिल्या.राहुल द्रविड यांनी त्यांच्या कारकिर्दीत स्वत:च्या शतकाचं इतकं सेलिब्रेशन किंवा आनंद साजरा केला नसेल, जितका त्यांनी वैभवच्या शतकाचा केला, असं त्यांच्याबरोबर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेले हरभजन सिंग, आरपी सिंह यांनी कॉमेंट्री करताना सांगितलं.प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सने २०९ धावांचा डोंगर उभारला.

या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानने १५.५ षटकांत लक्ष्य पूर्ण केले. वैभव व्यतिरिक्त, यशस्वी जैस्वालने ७० धावांची नाबाद खेळी केली आणि कर्णधार रियान पराग ३२ धावांवर नाबाद परतला. आयपीएल २०२५ च्या प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी राजस्थानला हा विजय खूप महत्त्वाचा होता. सलामीला आलेल्या वैभव सूर्यवंशीने अनोखी फलंदाजी करत सर्व गोलंदाजांची धुलाई करत ३५ चेंडूत शतक झळकावलं. वैभवची स्फोटक फलंदाजी पाहून राजस्थानचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आनंदाने उत्साहित झाले.

### 35 चेंडूत हे शतक पूर्ण केले

एवढंच नाही तर या धाडसी खेळीनंतर राहुल यांनी अक्षरश: स्वत:ची दुखापत विसरून उडीच मारली. ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे. वैभव सूर्यवंशीने क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव सोनेरी अक्षरात उमटवले आहे. त्याने गुजरात टायटन्सविरुद्ध ३८ चेंडूत १०१ धावांची खेळी केली. वैभव सूर्यवंशीने २६५.७८ च्या स्ट्राईक रेटने या धावा केल्या, ज्यामध्ये ७ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता. त्याने फक्त ३५ चेंडूत हे शतक पूर्ण केले. यासह,यापूर्वी हा विक्रम युसूफ पठाणच्या नावावर होता. २०१० मध्ये राजस्थान रॉयल्सकडून मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळताना त्याने हे शतक झळकावले होते. आता १५ वर्षांनंतर, वैभव सूर्यवंशीने त्याला मागे टाकले आहे.वैभवची स्फोटक फलंदाजी पाहून राजस्थानचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड खूप आनंदी झाले होते. एवढेच नाही तर या धाडसी खेळीनंतर राहुलने जागेवरून उडी मारली.

# आयपीएलमध्ये सामन्यांची संख्या वाढणार!

## आता आयपीएलमध्ये 74 ऐवजी 94 सामने खेळवले जाणार

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारतात सध्या आयपीएल २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेतील निम्मे सामने जवळपास पूर्ण झाले आहेत. काही संघ स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या वाटेवर आहेत. तर काही संघांना प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याची सुवर्णसंधी आहे. दरम्यान या स्पर्धेबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. २०२८ मध्ये होणाऱ्या आयपीएल स्पर्धेत सामन्यांची संख्या वाढणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.**



आयपीएल २०२५ स्पर्धेला २२ एप्रिलपासून सुरूवात झाली आहे. ठरलेल्या वेळापत्रकानुसार या स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. यापूर्वी बीसीसीआयने आयपीएल २०२५ स्पर्धेत ८४ सामने खेळवण्याचा प्रस्ताव ठेवला होता, मात्र हा प्रस्ताव यशस्वी होऊ शकला नव्हता. आयपीएलचे चेअरमन अरुण धुमाळ यांनी ईएसक्रीकइन्फोला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, बीसीसीआय सामन्यांची संख्या ९४ पर्यंत घेऊन जाण्याच्या विचारात आहे.मात्र हे दिसतं तितकं सोपं नसणार आहे. कारण सामन्यांची संख्या वाढणार म्हणजे स्पर्धेचा कालावधीही वाढणार. आयपीएल ही अशी एकमेव स्पर्धा आहे, ज्या स्पर्धेत केवळ भारतातील नव्हे तर जगभरातील स्टार खेळाडू खेळतात. त्यामुळे बीसीसीआयला आयपीएलच्या आयोजनासाठी स्पेशल विंडो मिळतो.

काही दिवस वाढवून घ्यावे लागतील. प्रत्येक संघाला प्रत्येक संघाविरुद्ध २ सामने खेळायला मिळायला हवे असा बीसीसीआयचा प्रयत्न आहे. एक सामना हा घरच्या मैदानावर असेल तर दुसरा सामना हा प्रतिस्पर्धी संघाच्या घरच्या मैदानावर असेल. त्यामुळे सामन्यांची संख्या ही ९४ वर जाऊन पोहोचेल. सामन्यांची संख्या वाढवायची की नाही, याबाबत बीसीसीआयला ब्रॉडकास्टर्ससोबत चर्चा करावी लागेल. जर एखादी स्पर्धा ३ महिन्यांहून अधिक काळ सुरू राहणार असेल, तर क्रिकेट चाहत्यांकडून या स्पर्धेला आधीसारखा प्रतिसाद येईल का? हे पाहणं देखील महत्वाचं ठरेल. यावेळी आयपीएल स्पर्धेला नवा विजेता मिळू शकतो. यावेळी पंजाब किंग्ज, दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ सध्या तुफान फॉर्ममध्ये आहेत. त्यामुळे यापैकी कुठलातरी एक संघ यावेळी आयपीएलची ट्रॉफी उंचावू शकतो.

### सामन्यांची संख्या 94 वर पोहोचेल

आयपीएल २०२५ स्पर्धेला २२ एप्रिलपासून सुरूवात झाली आहे. ठरलेल्या वेळापत्रकानुसार या स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. आयपीएलचे चेअरमन अरुण धुमाळ यांनी ईएसक्रीकइन्फोला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, बीसीसीआय सामन्यांची संख्या ९४ पर्यंत घेऊन जाण्याच्या विचारात आहे

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
। दि. 29 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## दिव्यांग बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी

# पिंपरीत राष्ट्रीय परिसंवाद!

### पिंपरी महापालिका दिव्यांग सक्षमीकरणाचे मॉडेल-राजेश अग्रवाल

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**‘दिव्यांग भवन अशी संकल्पना राबवणारी पिंपरी चिंचवड देशातील पहिली महानगरपालिका आहे. प्रत्येक राज्यातील महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला भेट देऊन असे उपक्रम राबवायला हवेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दिव्यांग भवन म्हणजे देशातील पहिल्या दिव्यांग सक्षमीकरणाचे आदर्श मॉडेल आहे,’ असे प्रतिपादन भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभागाचे सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशन तर्फे ग. दि. माडगुळकर नाट्यगृह, आकुर्डी येथे राष्ट्रीय परिसंवाद संपन्न झाला. यावेळी अग्रवाल बोलत होते. ते दुरदृश्यप्रणालीद्वारे परिसंवादात सहभागी झाले होते.

या परिसंवादाला भारत पुनर्वसन परिषदेचे डॉ. शरणजीत कौर , पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, दिव्यांग भवन फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे,दिव्यांग कक्षाच्या सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे,प्रशासन अधिकारी संगीता बांगर उपस्थित होते.

परिसंवादात मार्गदर्शन करताना डॉ. शरणजीत कौर म्हणाल्या की, ‘मी माझ्या ३३ वर्षांच्या कारकिर्दीत दिव्यांग भवनसारखा उपक्रम यापूर्वी कधीच पाहिला नाही. देशातील सर्व महानगरपालिकांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपक्रमांची दखल घेत असे उपक्रम राबवावेत,’ असे मत त्यांनी व्यक्त केले.

आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले की, ‘दिव्यांग मुलांची नोंद घेण्यासाठी लवकरच ‘शून्य ते सहा’ ही विशेष मोहीम राबवली जाणार आहे. यामध्ये घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जाईल, ज्यातून शहरात किमान एक लाख दिव्यांगांची नोंद होईल. अंगणवाडी सेविकांचा या उपक्रमात मोलाचा वाटा राहील.’ याप्रसंगी आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते ‘उन्नती समावेशित शिक्षणाची, प्रथम या संस्थेचा शीघ्र हस्तक्षेपण व शालेय तयारीकरिता क्रॉस डिसेबिलिटी (दिव्यांगत्व) अभ्यासक्रम आराखड्याचे प्रकाशन करण्यात आले.

> “दिव्यांग भवन फाऊंडेशन’ आणि इतर संस्थांनी महानगरपालिकेसोबत केलेले कार्य कौतुकास्पद आहे. महानगरपालिकेचे दिव्यांग भवन देशभरासाठी एक आदर्श केंद्र बनवण्याचा प्रयत्न करावा. आपली महानगरपालिका केवळ नेतृत्व देणारी नाही, तर देशभरातील लोकांसाठी आदर्श केंद्रही बनू शकते,’
> **–शेखर सिंह,** आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

## उद्यानांमध्ये पहिल्यांदाच कॅशलेस प्रवेश

### 10 उद्यानांमध्ये पीओएस मशिन्स कार्यान्वित

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाने शहरातील १० लोकप्रिय उद्यान आणि इतर सुविधांमध्ये एकूण १३ पॉइंट-ऑफ-सेल म्हणजेच पीओएस मशिन्सची व्यवस्था केली आहे.**

पीसीएमसीच्या उद्यानांमध्ये पहिल्यांदाच पीओएस मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. यापूर्वी प्रवेश शुल्कासाठी फक्त रोख व्यवहार स्वीकारले जात होते. आता या नव्या प्रणालीमुळे नागरिक पीओएस मशिनद्वारे प्रवेश शुल्क भरणार असून, प्रत्येक व्यवहारासाठी एक प्रत्येक व्यवहारासाठी एक नवीन डायनॅमिक क्यूआर कोड तयार होईल. त्यामुळे प्रत्येक पेमेंटची नोंद राहील आणि व्यवहार पारदर्शक होतील.

या उपक्रमाविषयी बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, “उद्यानांमध्ये पीओएस मशिन्सचा वापर सुरू केल्यामुळे आम्ही अधिक पारदर्शक आणि जबाबदार प्रणाली निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. प्रत्येक व्यवहाराचा डिजिटल ठसा राहिल्याने नागरिकांचा विश्वास वाढेल आणि त्यांना अधिक सोय होईल.” उद्यान विभागाचे सहायक आयुक्त उमेश ढाकणे म्हणाले, “पीओएस आधारित कॅशलेस प्रणालीमुळे कामकाजात सुसूत्रता येईल आणि उद्यानांच्या प्रवेश व्यवहारांचे अधिक प्रभावीपणे निरीक्षण आणि लेखापरीक्षण करता येईल. ही आपल्या सुविधांच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक मोठी झेप आहे.” सदर पीओएस मशिन्स भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान (२ मशिन्स), राजमाता जिजाऊ उद्यान (डायनासोर गार्डन) (२ मशिन्स), दुर्गादेवी उद्यान (१ मशिन), वीर सावरकर उद्यान (१ मशिन), बर्ड व्हॅली उद्यान (१ मशिन), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान (१ मशिन), भोसरी सहल केंद्र (१ मशिन), थेरगाव बोट क्लब (१ मशिन), गुलाब पुष्प उद्यान (ऑफिस – १, नेहरूनगर – १), सेंट्रल नर्सरी (१ मशिन) याठिकाणी बसवण्यात आल्या आहेत.




Gayatri English Medium School
& Jr. College, Moshi
We're Hiring
AI/ML Freshers!
Eligible?
• B.E./B.Tech in CS/IT/AI/DS
• Solid ML & Python skills
• Passion for AI/ML?
Internship-cum-Placement | Min. 6.5 CGPA
Apply now & work on real-world AI projects!
APPLY TODAY!
Let's build the future together.
Location: Pune
gayatriems@gmail.com
9689881670

From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch

"यत् भावो – तत् भवति"

## Our Courses

- Corel Draw
- Adobe Photoshop
- Scratch Animation
- 'C' Language
- 'C ++' Language
- Basic Java
- Basic Tally
- M. S. Office



Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

# 2025-26
# ADMISSIONS
## OPEN

**PRIYADARSHANI**
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now

**86687 55826**

**98232 31705**

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

KAMALA Education Society

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

# BBA



**Bachelor of Business Administration**

# BCA



**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is Creativity, There is Master Mind
CREATIVE
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7 STAR RANKING
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality Management
Website : www.http://mastermindglobalschool.com